नि.क्रं ८५ खाली आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दाव्यातुन प्रतिवादी क्रं ११ यांचे नाव कमी करण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. वादीचे म्हणणे असे की, प्रस्तुतचा दावा वादीने वाटपासाठी,निरंतर मनाईसाठी व ठरावाकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी क्रं ११ यांचेमध्ये कोर्टाबाहेर तडजोड झालेली असुन वादीस प्रतिवादी क्रं ११ यांचे विरुध्द दावा चालविणे नाही. वादीने प्रतिवादी नं ११ यांचे विरुध्द दाव्यात केलेल्या सर्व मागण्या सोडुन दिलेल्या आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्रं ११ यांचे नाव या दाव्यातुन काढुन टाकणे गरजेचे असुन त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती होणे गरजेचे आहे. म्हणुन वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्रं १ ते ४ यांनी नि.क्र ८७ प्रमाणे म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादींचे म्हणणे असे की, सदर दावा वाटपाचा असुन वादी यांचे कथनानुसार प्रतिवादी क्रं ११ याने संगणमत करुन गट क्रं १५/२/ब (जुना नं १५/२/२) चे खरेदीखत अस्तीत्वात आणले आहे. वादीचे कथनानुसार वादी व प्रतिवादी क्रं १ ते १० यांचा दावा मिळकतीमध्ये समान व कायदेशीर हिस्सा आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांचा दावा मिळकतीच्या इंच न इंच जागेवर सरस निरस मानाने वाटप होत नाही तोपर्यंत समान हक्क आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत प्रतिवादी क्रं ११ विरुध्द सोडुन दिलेल्या मागण्या हे बेकायदेशीर आहेत. वाद मिळकत गट क्रं १५/२/ब (जुना नं १५/२/२) चे खरेदीखत प्रतिवादी क्रं ११ यांनी बेकायदेशीर, सर्व वारसांच्या संमत्तीशिवास अस्तित्वात आणलेले आहे. त्यामुळे वादीची पुरसिस अमान्य करण्यात यावी.

४. प्रस्तुत अर्जाचे व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. या ठिकाणी हे नमुद करणे जरुरीचे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्रं १ ते ११ यांचे विरुध्द वाटप, मनाई व ठरावा करिता दाखल केलेला आहे. तसेच दाव्याचे परिच्छेद क्रं १६ मध्ये वादीने अ.क्रं क ला दि.२८/०४/२००६ रोजीचे प्रतिवादी क्रं ११ यास लिहुन दिलेले अ.क्रं नंबर ७४७/२००६ चे खरेदीखत वादी यांच्या अविभक्त हिश्यापुरते बेकायदेशीर असल्याने

सदरचे खरेदीखत वादीवर बंधनकारक नसल्याचा व प्रतिवादी क्रं ११ यांचे तेवढया हिश्याचा ताबा बेकायदेशीर असल्याचा ठराव करुन मिळावा व गट नं गट क्रं १५/२/ब (जुना नं १५/२/२) या जमिनीमधील वादी यांचा १/३ हिस्सा देण्याचा हुकुम व्हावा अशी विनंती केलेली आहे.

५. या ठिकाणी हे ध्यानात घेणे जरुरीचे की, प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरिता दाखल केलेला आहे. दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दावा मिळकतीपैकी काही भाग प्रतिवादी क्रं ११ यांनी खरेदी केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रं ११ हे दावा मिळकतीतील सहहिस्सेदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. वाटपाच्या दाव्यामध्ये दावा मिळकतीमध्ये हिस्सा असणा-या प्रत्येक हिस्सेदारास सामील करणे आवश्यक असते. अशा परिस्थितीत सदरचा दावा गुणदोषावर निर्णायक करण्याकरिता प्रतिवादी क्रं ११ हे दाव्यातील आवश्यक ते पक्षकार आहेत. अशा परिस्थितीत त्यांना दाव्यातुन वगळल्यास दाव्यातील गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर दावा गुणदोषावर निर्णायक करण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे उचित होणार नाही. त्यामुळे खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

अर्ज नि.क्रं ८५ नामंजुर करण्यात येतो.

सही
(ह.उ.उ.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश, भोर
जि.पुणे.

दिनांक : २७/०९/२०२२

## Certificate

**“I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order.**
**Name of the Steno : V.G.Fulari**
**Court Name : H.U.U. Patil**
**Jt. C.J.J.D., Bhor, Dist. Pune.**
**Date : 27/09/2022**
**Order signed by presiding officer on : 29/09/2022**
**Order uploaded on : 29/09/2022.**